# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर
## P.R.O Office, Palghar
Phone No. 02525-297032, Mob No.8669604078
Address: SP Office, Bidco Road, Palghar(W)
E-mail : propalghar@gmail.com

**प्रेसनोट क्र. ५२२ दिनांक १७/०६/२०२०**

## सफाळा पोलीसांनी केली घरफोडीच्या गुन्हयातील आरोपीतांना काही तासांतच मुद्देमालासह अटक

दिनांक ०८/०६/२०२० रोजी २३.३० वाजताचे सुमारास माकणे सफाळे पश्चिम येथील पंडीतपाडा याठिकाणी असलेल्या सेंटरपार्क रहीवाशी संकुलातील कन्स्ट्रक्शन पुर्ण झालेल्या फिर्यादी अक्षय रमेशभाई तोगडीया यांचे “प्रितीदर्पण” हया इमारतीमधील तळमजल्यावरील फ्लॅट नंबर ००३ मध्ये ता.जि.पालघर येथुन एशियन अल्टीमा कंपनीचे प्रत्येकी २० लीटर मापाचे एकूण १४ कलरने भरलेले डब्बे तसेच सफेद व चॉकलेटी रंगाच्या एकूण ४० बॉक्स बाथरुम टाईल्स असा एकुण ०१,०९,९६२/- रुपये किंमतीचा माल कोणीतरी अज्ञात चोरटयांनी चोरुन नेला होता. त्याबाबत सफाळा पोलीस ठाणे गुरनं ४३/२०२० भा.दं.वि.सं. कलम ४५४, ४५७, ३८० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हा कौशल्यपुर्ण तपासाअंती व मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे अवघ्या काही तासांतच उघडकीस आणण्यास सफाळा पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना यश प्राप्त झालेले आहे. सदर गुन्हयात आरोपीत १) करण रविंद्र पाटील वय ३० वर्षे २) अरविंद शाम करळकर वय ३२ वर्षे ३) रोहन ज्ञानेश्वर तरे वय २१ वर्षे सर्व रा. माकणे ता.जि. पालघर यांना अटक करण्यात आलेली असुन त्यांच्याकडुन गुन्हयात चोरीस गेलेला संपुर्ण माल हस्तगत करण्यात आला आहे.

सदरची कारवाई ही प्रभारी अधिकारी सपोनि/सुनिल जाधव यांचे मार्गदर्शनाखाली पो.उप निरी. पंकज पाटील, पो.हवा/९२ महेंद्र शर्मा, पो.कॉ/१६७३ अमर गायकवाड, यांनी केलेली आहे.